# उल्हासनगर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग

(प.ा) 11:30am 13-9-24

दिनांक : १२/०९/२०२४

## प्रेसनोट

दिनांक ११.०९.२०२४ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री विकास ढाकणे यांनी कल्याण बदलापूर रोडची पाहणी केली. पाहणी करतेवेळी अति. आयुक्त जमिर लेंगरेकर, किशोर गवस, उपायुक्त डॉ. सुभाष जाधव, शहर अभियंता तरुण सेवकानी, नोडल अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त गणेश शिंपी, सहाय्यक आयुक्त मनिष हिवरे हे उपस्थित होते. सदर पाहणी करतांना मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी खालील प्रमाणे निर्देश दिले.

१. छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार याची दुरुस्ती करणे, येथे असलेले कांरजे (Fountain) येथील जंगली झाडे व अति वाढलेली गवत काढावे तेथे असलेले झेंडे, फलक, होर्डिंग,बॅनर काढुन घ्यावे, विद्युत केबल काढणे.

२. कल्याण बदलापूर महामार्गातील दुभाजकाची दुरुस्ती करुन, नव्याने रंगरंगोटी करावी तसेच दुभाजकामधील खराब झालेली झाडे काढून तेथे नवीन झाडे लावण्यात यावे.

३. कल्याण बदलापूर महामार्गातील ठिकठिकाणी असलेले खड्डे महत्वाचे चौक येथे डांबरीकरण करुन सुस्थितीत करावे त्यांनतर तेथे थर्मोप्लास्टिक पेंट द्वारे रेखांकीत करावे.

४. रस्त्याच्या दोन्ही बाजूस अनधिकृत उभे असलेले वाहन, शेड, हातगाड्या व पानटप-या त्वरीत हटविण्यात यावे.

५. सदर रस्त्यावर असलेले वाहन वाशिंग सेंटर यांची पाणीपट्टी त्वरीत तपासून त्वरीत योग्य ती कार्यवाही करावी.

६. सदर रस्त्यावरील ठिकठिकाणी असलेल्या कचराकुंड्या व इतरत्र कचरा त्वरीत स्वच्छ करावा व धूळीच्या ठिकाणी आवश्यक ती कार्यवाही करावी.

७. छत्रपती महाराज प्रवेश द्वार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेश द्वार तसेच रस्त्याच्या दुभाजकावरील विद्युत वाहिन्या(केबल) त्वरीत हटविण्यात यावे.

८. सदर रस्त्यास बाधित विद्युत ट्रान्सफॉर्मर उचित ठिकाणी हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी. असे निर्देश देण्यात आले.

12/9/24

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.